८

# हिंदु राष्ट्राच्या स्थापनेची दिशा

## मनोगत

हिंदु धर्म आणि भारतवर्ष यांचे वैशिष्ट्य असे की, येथे भविष्यात घडणाऱ्या अद्वितीय घटनांचा उच्चार त्या घडण्यापूर्वी होतो. वाल्मिकि ऋषींनी अलौकिक प्रतिभादृष्टीतून प्रथम रामायण रचले. तद्नंतर प्रभु श्रीरामाचा अवतार झाला आणि ऐतिहासिक 'रामराज्य' पृथ्वीतलावर अवतरले. भगवान श्रीकृष्णाच्या जन्माच्या पूर्वीही दैवी आकाशवाणी झाली. आकाशवाणीनुसार जन्मलेल्या भगवान श्रीकृष्णाने धर्मसंस्थापना केली आणि पुनश्च पृथ्वीवर 'धर्मराज्य' अवतरले. अध्यात्मातील अधिकारी व्यक्ती असलेल्या परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी सर्वप्रथम १९९८ या वर्षी 'भारतात वर्ष २०२३ मध्ये 'ईश्वरी राज्य' म्हणजे 'हिंदु राष्ट्र' स्थापित होईल', असा विचार द्रष्टेपणाने मांडला होता. तेव्हापासूनच ते 'हिंदु राष्ट्र' या विषयावर सातत्याने वैचारिक आणि आध्यात्मिक स्तरांवरील लिखाण करत आहेत. या विचारांत आगामी काळात होणाऱ्या आदर्श राष्ट्ररचनेचे, म्हणजेच धर्मसंस्थापनेचे बीज रोवलेले आहे. हिंदु राष्ट्राच्या स्थापनेविषयी कोणत्याही आशादायी घटना स्थुलातून घडत नसतांना 'हिंदु राष्ट्रा'विषयी सांगणे, ही काहींना अतिशयोक्ती वाटेल; पण काळाची पावले ओळखणाऱ्या संतांना त्या उज्ज्वल भविष्याची चाहूल लागली आहे. आपण त्या दिशेने प्रयत्न करणे, ही आपली साधना आहे.

परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी वेळोवेळी 'हिंदु राष्ट्र' या विषयासंबंधी लिहिलेल्या एकूण विचारांपैकी केवळ हिंदु राष्ट्राच्या स्थापनेची दिशा देणाऱ्या विचारांचाच या ग्रंथात समावेश केलेला आहे. हा ग्रंथ म्हणजे परात्पर गुरु डॉ. आठवले यांचा विचारसंग्रह असून त्यात त्यांचे स्फूटलेख आणि लेख या दोन्हींचा अंतर्भाव आहे. 'हिंदु राष्ट्र' या शब्दाची व्याख्या अनेक विचारवेत्त्यांनी भूगोल, इतिहास, संस्कृती आणि तत्त्वज्ञान यांच्या आधारे केली आहे. परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी 'हिंदु राष्ट्र' या विषयाची आध्यात्मिक दृष्टीकोनातून मांडणी केली आहे. विश्वकल्याणाची व्यापक आध्यात्मिक शिकवण देणाऱ्या भारतातच नव्हे, तर पृथ्वीवर सर्वत्र 'हिंदु राष्ट्र' स्थापन करणे, ही एक आध्यात्मिक प्रक्रिया आहे, हे या ग्रंथातून सहज लक्षात येईल.

स्वातंत्र्यवीर सावरकर, आद्यसरसंघचालक डॉ. हेडगेवार, पू. गोळवलकरगुरुजी आदी थोर पुरुषांनीही हिंदु राष्ट्राचा विचार प्रखरपणे मांडला. दुर्दैवाने स्वयंभू हिंदु राष्ट्र असलेले भारतवर्ष हे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर धर्मनिरपेक्ष राष्ट्र बनले आणि 'हिंदु राष्ट्र' ही तेजस्वी संकल्पना झाकोळून गेली. जेथे 'रामराज्य' प्रत्यक्षात अवतरले, ते राज्य आज एक दंतकथा ठरवली जात आहे. छत्रपती शिवरायांनी स्थापिलेले 'हिंदवी स्वराज्य' म्हणजेच 'हिंदु राष्ट्र' विस्मृतीत नेऊन त्याला 'धर्मनिरपेक्ष राज्या'च्या नावाखाली 'हिरवा रंग' फासण्याचा खटाटोप केला जात आहे. त्याहीपुढे जाऊन 'हिंदु राष्ट्र म्हणजे धर्मांधता', असा अपप्रचार हेतूपूर्वक केला जात आहे. या धर्मनिरपेक्षतेमुळे देशासमोर असंख्य समस्या निर्माण झालेल्या असूनही धर्मनिरपेक्षतेविषयी अंधश्रद्धा बाळगणाऱ्यांना आजही भारत हे 'धर्मनिरपेक्ष राज्य' म्हणूनच हवे आहे. 'हिंदु राष्ट्र' हा विषय त्यांच्या खिजगणतीतही नाही. त्यांना हे ज्ञात नाही की, 'धर्मनिरपेक्ष राज्य' कि 'हिंदु राज्य' हा खरा प्रश्न नसून 'इस्लामी राज्य कि 'हिंदु राज्य ?', असा प्रश्न येत्या काही वर्षांत उत्पन्न होणार आहे. अशा परिस्थितीत केवळ हिंदूसंघटन करणारी विचारधाराच या देशाचे रक्षण अन् हिंदु राष्ट्राचे निर्माण करू शकते. हिंदु राष्ट्राच्या आकांक्षा सफल होण्यासाठी हिंदु समाजाचा हिंदु राष्ट्राविषयीचा विचार, उच्चार आणि आचार सर्वत्र एकसमान दिसला पाहिजे. म्हणूनच 'हिंदु समाजातील विविध घटक, उदा. हिंदु संघटना, संप्रदाय, संत, अधिवक्ते, विचारवंत आदींनी 'हिंदु राष्ट्र' स्थापनेसाठी काय प्रयत्न केले पाहिजेत', याचे दिशादर्शन या ग्रंथामध्ये केले आहे.

परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या प्रेरणादायी विचारांतून स्फूर्ती घेऊन आगामी काळात हिंदु समाजाला भारतभूमीत रामराज्याची अनुभूती देणारे 'हिंदु राष्ट्र' स्थापन करण्यासाठी खारीचा नव्हे, तर हनुमानाचा वाटा उचलण्याची प्रेरणा व्हावी आणि त्याने या कार्यासाठी शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक स्तरांवर अथक परिश्रम घ्यावेत, ही प्रभु श्रीरामाच्या चरणी प्रार्थना ! – **संकलक**

## अनुक्रमणिका

[काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे (मुद्दे) '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.]

**प्रकरण १ : 'हिंदु राष्ट्र' : मूलभूत विचार** १३

१. व्याख्या आणि समानार्थी शब्द १३

२. हिंदु राष्ट्र-स्थापनेचे आदर्श १४

३. हिंदु राष्ट्राची मागणी करणे, हा हिंदूंचा संवैधानिक अधिकार ! १६

४. 'हिंदु राष्ट्रा'ला विरोध करणाऱ्यांना पुढील प्रश्न विचारा ! १७

५. हिंदु राष्ट्राच्या स्थापनेची सूक्ष्मातील आणि स्थुलातील प्रक्रिया समजून घ्या ! १८

**प्रकरण २ : हिंदु राष्ट्राच्या स्थापनेच्या दृष्टीने साधनेचे महत्त्व** २२

१. हिंदु राष्ट्राची स्थापना करण्यासाठी सध्याचे बहुतांश धर्मनिरपेक्ष राजकारणी अपात्र का आहेत ? २२

२. धर्माचरणी हिंदूच 'हिंदु राष्ट्र' स्थापन करू शकतात ! २२

३. साधना म्हणजे काय ? २५

४. हिंदु राष्ट्र-स्थापनेचे कार्य करतांना कोणती साधना करावी ? २५

५. हिंदु राष्ट्राच्या स्थापनेच्या दृष्टीने साधनेची आवश्यकता २७

६. हिंदुत्ववादी संघटनांनी त्यांच्या कार्यकर्त्यांनाही साधना करण्यास प्रवृत्त करणे आवश्यक ! ३१

**प्रकरण ३ : हिंदु राष्ट्राच्या स्थापनेच्या दृष्टीने ब्राह्मतेजाचे महत्त्व** ३३

* ब्राह्मतेज म्हणजे काय ? * ब्राह्मतेजाची आवश्यकता ३३

* ब्राह्मतेजाद्वारे कार्य कसे होते ? * ब्राह्मतेजाचे महत्त्व ३५

* क्षात्रतेजासह ब्राह्मतेज असण्याचे महत्त्व सांगणारी उदाहरणे ३६

**प्रकरण ४ : हिंदु राष्ट्राच्या निर्मितीतील सूक्ष्मातील 'देवासुर युद्ध' ! ३८**

* देवासुर युद्ध म्हणजे काय ? ३८
* हिंदु राष्ट्र-स्थापनेसाठीच्या शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक स्तरांवरील प्रयत्नांची तुलना ४३

**प्रकरण ५ : हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी सांप्रदायिक ऐक्य हवे ! ४५**

* सर्व संप्रदायांमधील निःस्वार्थी अनुयायांद्वारे हिंदु राष्ट्राची स्थापना शक्य ! ४५
* सांप्रदायिकांनो, धर्मसंस्थापनेचे, म्हणजेच हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचे कार्य करा ! ४५

**प्रकरण ६ : हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी एकत्रित कार्य करण्याची दिशा ! ४७**

१. निःस्वार्थी हिंदुत्ववादी संघटना हिंदु राष्ट्राच्या स्थापनेच्या मागणीसाठी निश्चित एकत्र येऊ शकतात ! ४७

२. हिंदु संघटनांनी राष्ट्र-स्तरावर एकत्र कार्य केल्याने होणारे लाभ

* स्थानिक स्तरावरील हिंदु आंदोलनांचे राष्ट्रीयीकरण होईल ! ४८

३. हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी हिंदुत्ववादी संघटनांनी एकत्रितपणे कार्य करण्याची दिशा ! ४९

* ब्राह्मतेज आणि क्षात्रतेज यांचे एकत्रित कार्य करणे अपेक्षित ! ४९
* विचारवंत व प्रत्यक्ष कृती करणारे यांचे एकत्रित कार्य हवे ! ४९
* जहाल आणि मवाळ संघटनांचे परस्परांना पूरक कार्य हवे ! ५०

**प्रकरण ७ : हिंदु राष्ट्राच्या स्थापनेतील विचारवंतांचे महत्त्व ५१**

* समाजातील अनेक घटकांचे संघटन होत असतांना हिंदुत्वनिष्ठ विचारवंतांचेही संघटन आवश्यक ! ५१

**प्रकरण ८ : हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचे प्रत्यक्ष कार्य** ५५

१. हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी कार्य करणाऱ्यांचे स्तर आणि त्यांचे कार्य करण्याचे स्वरूप ५५

२. हिंदु राष्ट्राच्या स्थापनेच्या कार्यातील घटक ५६

* धर्मशिक्षण * धर्मजागृती * राष्ट्र आणि धर्म रक्षण ५७

३. धर्मक्रांती, हाच हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा अंतिम मार्ग ! ५९

४. हिंदु राष्ट्र-स्थापनेसाठी आवश्यक धर्मक्रांती होण्यासाठी हे करा !

* हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी जनता हा केंद्रबिंदू आणि जनजागृती हेच माध्यम ! ६०

* लोकशाहीतील दृष्प्रवृत्तींच्या विरोधात लढा द्या ! ६१

* वैचारिक पातळीवर हिंदु राष्ट्राचा विचार प्रसारित करा ! ६१

* हिंदूंची प्रभावी संघशक्ती निर्माण करणे, हा धर्मक्रांतीतील महत्त्वाचा टप्पा ! ६२

५. हिंदु राष्ट्राच्या स्थापनेतील विविध कार्यांचा कालावधी ६३

६. हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचे कार्य संधीकालात करण्याचे महत्त्व! ६४

**प्रकरण ९ : हिंदु राष्ट्र-स्थापनेच्या भावी काळातील कार्याची दिशा** ६६

* हिंदु राष्ट्राची स्थापना हे तीन पिढ्यांनी करावयाचे कार्य ! ६६

**प्रकरण १० : हिंदु राष्ट्राच्या स्थापनेच्या कार्यात सहभागी व्हा !** ७०

* हिंदु राष्ट्र स्थापणे, हा पहिला टप्पा, तर ‘जगभर हिंदु धर्माची प्रस्थापना करणे’, हा अंतिम टप्पा ! ७२

---

**टीपा** १. ग्रंथातील प्रत्येक विचाराच्या शेवटी कंसात दिनांक / वर्ष दिले आहे. परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी त्या दिवशी ते ते विचार लिहिले आहेत.

२. ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.